वाचले,

१) आदेश क्र.ई-गव्हर्नन्स/२/कावि/५६३/२०१४ दि.०४/०८/२०१४
२) आदेश क्र.नासुकें/१/कावि/४०/२०१५ दि.०२/०२/२०१५
३) आदेश क्र.नासुकें/१/कावि/२७७/२०१५ दि.३१/०७/२०१५
४) आदेश क्र.नासुकें/१/कावि/६०/२०१६ दि.१६/०२/२०१६
५) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१५८९३ दि०५/०४/२०१६
६) आदेश क्र.नासुकें/१/कावि/३५२/२०१६ दि.०६/०९/२०१६
७) आदेश क्र.नासुकें/१/कावि/४४१/२०१६ दि.०२/११/२०१६
८) श्रीम.संजना सोनवणे यांचा दि.२४/०४/२०१७ रोजीचा अर्ज
९) मा.आयुक्त सो.यांनी मान्य केलेला दि.२५/०४/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
दिनांक :-२५/०४/२०१७
क्र.नासुकें/१/कावि/१२८/२०१७

**विषय :- अ व फ क्षेत्रीय कार्यालयामधील नागरी सुविधा केंद्राचे मुदतवाढीबाबत...**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या सोयीसाठी खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र सुरु करणेकामी केंद्र चालक नियुक्ती साठी अर्ज मागविणेत आलेले होते. परंतु, अ व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधून नागरी सुविधा केंद्रासाठी अर्ज प्राप्त न झाल्याने नागरीकांच्या सोयीसाठी वाचले क्र.१ चे आदेशान्वये अ क्षेत्रीय कार्यालयाच्या तळमजल्यावरील नागरी सुविधा केंद्रामध्ये भाडे तत्वावर जागा उपलब्ध करुन खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र चालविणेकामी ६ महिन्यांसाठी परवानगी देणेत आलेली आहे. त्याची मुदत दि.०३/०२/२०१५ रोजी संपुष्टात आल्याने वाचले क्र.२ चे आदेशान्वये दि.०३/०८/२०१५ पर्यंत आणि वाचले क्र.३ चे आदेशान्वये दि०२/०२/२०१६ पर्यंत आणि वाचले क्र.४ चे आदेशान्वये दि.०३/०८/२०१६ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. याबाबत मा.स्थायी समितीकडील वाचले क्र.५ चे ठरावान्वये मान्यता दिलेली आहे.

सदर काळात नागरवस्ती विकास योजना विभागाकडून नागरीकांसाठी विविध योजना जाहीर करण्यात आल्या होत्या व त्यासंबंधी अर्जांचे वाटप करण्यात आले होते. अ व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील नागरीकांच्या सोयीसाठी त्या परिसरामध्ये नागरी सुविधा केंद्राची आवश्यकता असलेने पर्यायी व्यवस्था म्हणून नागरीकांची गैरसोय होऊ नये यासाठी वाचले क्र.६ अन्वये तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेत आली आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील RFP नोटीस क्र.८/२०१६ अन्वये तिसऱ्या टप्प्यात शिल्लक वॉर्डांमध्ये नागरी सुविधा केंद्र चालक नियुक्ती संबंधीची जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. परंतु, त्या काळात पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका २०१७ चे आचारसंहिता लागू झालेने सदर नियुक्तीचे कामकाज तात्पुरत्या स्वरुपात थांबवले होते. सदर नियुक्ती होईपर्यंत नागरीकांची गैरसोय होऊ नये यासाठी वाचले क्र.७ चे आदेशान्वये ६ महिन्यांसाठी म्हणजेच दि.३०/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. वाचले क्र.८ अन्वये श्रीम.संजना सोनवणे यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

RFP नोटीस क्र.८/२०१६ अन्वये तिसऱ्या टप्प्यात शिल्लक वॉर्डांमध्ये नागरी सुविधा केंद्र चालक नियुक्तीचे कामकाज प्रस्तावित आहे. त्यामुळे अ व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात नवीन नागरी सुविधा केंद्र सुरू होईपर्यंत नागरीकांची गैरसोय होऊ नये म्हणून नागरी सुविधा केंद्राची आवश्यकता आहे.

...२

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी या आदेशान्वये श्रीम.संजना संदिप सोनवणे यांना उपरोक्त वाचले क्र.१ चे अटी व शर्ती आणि करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार अ क्षेत्रीय कार्यालयाचे तळघरातील नागरी सुविधा केंद्र चालू ठेवणेकामी पुढील सहा महिन्यांकरिता म्हणजेच **दि.३१/१०/२०१७** पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८

प्रति – श्रीम.संजना संदिप सोनवणे, केंद्र चालक

प्रत – १) भूमि आणि जिंदगी विभाग, मुख्य कार्यालय
२) अ क्षेत्रीय कार्यालय, भूमि आणि जिंदगी विभाग
३) माहिती व तंत्रज्ञान विभाग
४) लेखा विभाग

**प्रशासन अधिकारी (ना.सु.कें.)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८